**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ या योजनेअंतर्गत लाभ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**शासन निर्णय कृकमा- ०५२६/प्र.क्र. १३४/२-स**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ११ सप्टेंबर, २०२६

**संदर्भ** :-१. शासन निर्णय क्र. कृकमा- ०५२६/प्र.क्र. ९३/का.२-स दि. ०२.०६.२०२६.
२. शासन निर्णय क्र. कृकमा- ०६२६/प्र.क्र. ११७/का.२-स, दि. ११.०६.२०२६.
३. शासन निर्णय क्र. कृकमा- ०५२६/प्र.क्र. ९३/का.२-स, दि. १७.०६.२०२६.
४. शासन पुरकपत्र क्र. कृकमा- ०५२६/प्र.क्र.९३/का.२-स, दि. १५.०७.२०२६.
५. मा. मंत्रिमंडळ उप समितीची दि. १८.०८.२०२६ रोजीची बैठक.

**प्रस्तावना :-**

मा. मंत्रिमंडळाच्या दि. ०२.०६.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ या योजनेस मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेस अनुसरुन संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ ही योजना जाहिर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत कर्जमुक्ती, एकवेळ समझोता (OTS) व प्रोत्साहनपर अनुदान या घटकांतर्गत शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे.

उक्त योजना गाव, तालुका व जिल्हा पातळीवर राबविण्यात येणार असून सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याकरीता संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच संदर्भाधीन क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये या योजनेअंतर्गत कर्जमुक्तीचा लाभ मिळण्यास पात्र असलेले शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहु नयेत, त्यांना देय असणारे लाभ विनाविलंब मिळावेत, योजनेची अंमलबजावणी पारदर्शकपणे व्हावी व योजनेत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना बँकांनी तात्काळ नव्याने पीक कर्ज पुरवठा करावा याकरीता सदर योजनेचा आढावा घेणे, योजनेच्या निकषात बदल करणे या उद्देशाने मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उप समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच संदर्भाधीन क्र.४ च्या शासन पुरक पत्रान्वये सदर योजनेच्या निकषामध्ये अंशत: बदल करण्यात आले आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ या योजनेच्या अनुषंगाने विविध मागण्यांच्या संदर्भात मा. मंत्री, मा. राज्यमंत्री, मा. लोकसभा सदस्य, मा. विधानमंडळ सदस्य यांनी शासनास निवेदने सादर केली आहेत. सदर निवेदनात केलेल्या सुचनेबाबत निर्णय घेण्याकरीता मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची दि. १८.०८.२०२६ रोजी मंत्रालय, मुंबई येथे बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार आदिवासी जिल्हे / Individual Forest Rights अंतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांना संबंधित बँकांनी पीक कर्ज दिलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांची जिल्हाधिकारी यांच्या

अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या जिल्हा स्तरीय समितीमार्फत छाननी करुन सदर समितीच्या अहवालानुसार पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांना व मृत / वयोवृध्द शेतकऱ्यांच्या वारसाबाबत उद्भवलेल्या तांत्रिक अडचणी दुर करुन पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्यास उप समितीची मान्यता देण्यात आली. त्यानुसार पात्र शेतकऱ्यांना लाभ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ या योजनेअंतर्गत आदिवासी जिल्हे / Individual Forest Rights अंतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांना संबंधित बँकांनी पीक कर्ज दिलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांची दि. ११.०६.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या जिल्हा स्तरीय समितीमार्फत छाननी करुन सदर समितीच्या अहवालानुसार पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मंजूर करण्याबाबत शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ या योजनेअंतर्गत मृत / वयोवृध्द शेतकऱ्यांच्या वारसाबाबत उद्भवलेल्या तांत्रिक अडचणी दुर करुन पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांना खालील अटींच्या अधीन राहुन योजनेचा लाभ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

1. मयत शेतकऱ्यांच्या वारसांनी महसूल दप्तरी रितसर त्यांच्या नावाची नोंद करुन ॲग्रीस्टॅक (Agristack) प्रणालीवर नोंदणी करणे अनिवार्य राहिल.
2. शेतकऱ्यांच्या संमतीने बँकेने कर्ज दिलेल्या वारसांची महसूल दप्तरी तसेच बँकेच्या रेकॉर्डला नोंद करुन ॲग्रीस्टॅक (Agristack) प्रणालीवर नोंदणी करणे अनिवार्य राहील.

३. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी वारसांच्या नोंदी घेण्यासाठी तालुका स्तरावर महसूल व कृषि विभागासोबत शिबीरांचे आयोजन करावे.

४. सदर शासन निर्णय, मा. मंत्रिमंडळ उप समितीच्या दि. १८.०८.२०२६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०९१११९५१३२५७४७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH ARUN PATIL

Digitally signed by SANTOSH ARUN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=CA78467BCC4594E1E11741A7962A7A83FEAFB1764425750371 60FC343C4AE5AB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E52439642AB57C332B2A3E3E46F0D907BA6167409EF6D 52C943BF775ECF042FD, cn=SANTOSH ARUN PATIL
Date: 2026.09.11 19:52:29 +05'30'

**(संतोष पाटील)**
**अपर निबंधक तथा सह सचिव,**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव (सहकार व पणन), मंत्रालय, मुंबई.
९) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) विभागीय आयुक्त (सर्व)
११) कृषी आयुक्त, पुणे
१२) जिल्हाधिकारी (सर्व)
१३) विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था (सर्व)
१४) व्यवस्थापकीय संचालक, महाआयटी, चर्चगेट, मुंबई.
१५) जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था (सर्व)
१६) समन्वयक, राज्यस्तरीय बँकर्स समिती, व्दारा बँक ऑफ महाराष्ट्र, शिवाजी नगर पुणे.
१७) निवड नस्ती (का.२-स)